उदय योजना - राज्यस्तरीय संनियंत्रण समिती गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३०४/ऊर्जा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०९ ऑक्टोबर, २०१७.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र: संकिर्ण-२०१५/प्र.क्र.३०४/ऊर्जा-५ दिनांक २७.१२.२०१६
२. त्रिपक्षीय करारनामा दिनांक ०७.१०.२०१६

प्रस्तावना:

राज्यातील वीज वितरण कंपन्यांची कार्यक्षमता व आर्थिक सक्षमता सन २०१९ पर्यंत वाढविण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी उदय योजना सुरु केली आहे.

२. दिनांक ०४.१०.२०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत राज्य शासनाने सदर उदय योजनेमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. सदर निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक ०७.१०.२०१६ रोजी केंद्र शासन, राज्य शासन व महावितरण कंपनी यांच्या मध्ये त्रिपक्षीय करार करण्यात आला.

३. त्रिपक्षीय करारानुसार महावितरण कंपनीची कार्यक्षमता व आर्थिक सक्षमता वाढविण्याबाबत महावितरण कंपनीतर्फे राबविण्यात येणाऱ्या विहित कालावधीतील उपाययोजना व साध्य या बाबींवर सनियंत्रण ठेवण्याकरिता त्रिपक्षीय करारातील परिच्छेद क्र.१.२ (r) नुसार महावितरण कंपनीने उदय योजने अंतर्गत केलेल्या प्रगतीचा आढावा प्रत्येक महिन्यात वित्त विभागाच्या प्रतिनिधी समवेत राज्यस्तरीय समितीने घ्यावा अशी तरतूद आहे. त्यानुषंगाने उदय योजनेकरिता राज्यस्तरीय संनियंत्रण समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

उदय योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय संनियंत्रण समिती गठित करण्यात येत आहे.

सदर समितीचे अध्यक्ष व सदस्य पुढीलप्रमाणे असतील -

(१)	मुख्य सचिव	:	अध्यक्ष
(२)	अपर मुख्य सचिव (वित्त)	:	सदस्य
(३)	प्रधान सचिव (नियोजन)	:	सदस्य
(४)	प्रधान सचिव (ऊर्जा)	:	सदस्य
(५)	अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण कंपनी	:	सदस्य
(६)	संचालक (वित्त), महावितरण कंपनी	:	सदस्य
(७)	संचालक (संचलन), महावितरण कंपनी	:	सदस्य
(८)	उपसचिव (ऊर्जा)	:	सदस्य सचिव

४. राज्यस्तरीय संनियंत्रण समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील -

१. उदय योजने अंतर्गत केलेल्या त्रिपक्षीय करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे, तांत्रिक व आर्थिक कार्यक्षमता उंचाविण्याबाबत महावितरण कंपनीने विहित कालावधीत केलेल्या / करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेणे.

२. उदय योजने अंतर्गत केलेल्या त्रिपक्षीय करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे, राज्य शासनाने करावयाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

३. उदय योजने अंतर्गत केलेल्या त्रिपक्षीय करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे, केंद्र शासनाकडे करावयाच्या कार्यवाहीबाबत पाठपुरावा करणे.

५. राज्यस्तरीय संनियंत्रण समितीची बैठक दर महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये घेण्यात यावी.

६. महावितरण कंपनीने सदर योजनेबाबतच्या प्रगतीचे सादरीकरण सदर समितीच्या बैठकीत करावे.

७. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१००९१७५३३०१११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2017.10.09 17:41:42 +05'30'

(भि.य.मंता)

शासनाचे उपसचिव

प्रत-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
४. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
५. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (वित्त) , वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महावितरण / महानिर्मिती / महापारेषण, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
११. सर्व मंत्रालयीन विभाग.
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१६. अवर सचिव (रोखशाखा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. कक्ष अधिकारी (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. कक्ष अधिकारी (प्रशासन-२), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.